# महाधम्म अधिवेशन

मुंबई, 18 एप्रिल, 2010

भिक्खु संघाज् युनायटेड बुद्धिस्ट मिशनद्वारा आयोजित महाधम्म अधिवेशनाचे उद्‌घाटन करताना मला विशेष आनंद होत आहे. हे मिशन गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रांमध्ये विविध कामे करीत आहे.

कोणत्याही समाजाचा पाया शांती, सौहार्द, करुणा आणि नैतिक मूल्यांवर आधारित असतो. एका सशक्त समाजाच्या निर्मितीसाठी आपल्याला या गुणांना वाव आणि प्रोत्साहन दिले पाहिजे आणि ते देशाच्या कानाकोपऱ्यात रुजविण्यासाठी आपणास निरंतर प्रयत्न केले पाहिजेत. असे मला नेहमी वाटते. आज हे महाधम्म अधिवेशन याच विषयावर आधारित आहे, जो विषय सर्वमान्य आहे.

मला असे सांगण्यात आले की बौद्ध भिक्खु संघातर्फे मुंबईमध्ये मैत्री, करुणा व समतेची भावना वाढावी म्हणून 2 एप्रिल ते 17 एप्रिल पर्यंत 'भीम ज्योत' काढली गेली. मैत्री, करुणा व समतेच्या या ज्योतीचा प्रकाश लोकांच्या मनात सदैव राहावा अशी आपण मनोकामना करुया. समाजात समता आणि ऐक्य टिकविण्यासाठी आमचे काय योगदान असू शकेल? दुसऱ्यांची आम्ही काय मदत करू शकतो? दुसऱ्याचे दु:ख कसे दूर केले जाऊ शकते? यासाठी आपण सर्वांनी चिंतन केले पाहिजे.

अडीच हजार वर्षांपूर्वी, दुसऱ्याचे दु:ख पाहून, राजकुमार सिद्धार्थाच्या मनात हेच विचार आले होते. परदु:खाने विचलीत होऊन त्यांनी आपल्या राजमहालातील सुख-सोयींचा परित्याग केला. सत्य आणि ज्ञानाच्या शोधात ते निघाले व संन्यासी बनले. दु:ख आणि समस्यांनी घेरलेल्या मानवाचा उद्‌धार कसा होऊ शकेल या उपायांचा ते गहन विचार करीत होते. अनेक वर्षांच्या साधनेचे फळ म्हणून त्यांना गया येथील बोधीवृक्षाखाली संपूर्ण ज्ञानाची प्राप्ती झाली. सिद्धार्थ पासून ते बुद्ध झाले.

भगवान बुद्धांना, सर्व मानव जातीच्या दु:ख व त्यावरील उपायांबाबत ज्ञानाच्या रुपाने चार सत्ये मिळाली. त्यांनी सांगितले की संसार दु:खमय आहे, त्या दु:खाची कारणे आहेत, दु:खावर उपाय आहे आणि दु:खाच्या निदानाचे मार्ग देखील आहेत. त्यांनी अज्ञान व तृष्णा हे दु:खाचे मूळ कारण मानले. दु:ख निवारणासाठी अष्टांग मार्ग अर्थात् सम्यक दृष्टी आणि सम्यक संकल्प, सम्यक वाणी आणि सम्यक कर्म, सम्यक आजीविका आणी सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी यांना त्यांनी अनिवार्य सांगितले.

भगवान बुद्धांनी सामुदायिक भावना विकसीत करण्यासाठी संघाची स्थापना केली. संघामध्ये समाजातील विविध वर्गांचे लोक सामील होते. संघाची कामे लोकशाही मार्गाने संपन्न होत व मतभेद सर्वसंमत्तीने सोडविले जात व निर्णय सुद्धा मतदानाने होत. संघ ही अशी विचारधारा आहे, जी आपणास आपापसात बंधुत्वाने राहण्याची आणि एकजूट होऊन कार्य करण्याची प्रेरणा देते.

बौद्ध धर्म मध्यम मार्ग स्विकारण्यावर भर देतो. भगवान बुद्धांनी सारनाथमध्ये भिक्षुंना पालीभाषेत सांगितले होते—

> ''दभो अंते,
> अनुप गम्म,
> मंझिया पटिपादा''

अर्थात् दोन अतिरेकी मार्गांना सोडून देऊन मध्यम मार्ग स्विकारावा. त्यांच्या मते हा एक असा पथ आहे ज्यामुळे मनाला शांती लाभते आणि अनेक विचार सहजपणे समजतात. त्यांचा हा उपदेश आम्हाला जीवनातील असंतुलन आणि अतिरेकाचा त्याग करण्याचा मार्ग सांगतो. विचार व कर्म यात संतुलन राखून मध्यम मार्गाचा अवलंब करून आपण समाजाचे अधिक कल्याण करु शकतो. खरे तर आपल्या श्रेष्ठ परंपरेचा हा एक विशेष गुण आहे. संस्कृतमध्ये पण म्हटले आहे, 'अति सर्वत्र वर्जयेत।' अर्थात् कोणत्याही गोष्टीचा अतिरेक चांगला नसतो. आपल्याला आपल्या जीवनात हे नेहमीच ध्यानात ठेवले पाहिजे.

भगवान बुद्धांच्या शांती, अहिंसा व मानवसेवा या शिकवणुकीने इतिहासातील विविध टप्प्यांमध्ये आपल्या देशाच्या महापुरुषांना प्रभावित केले. महान सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्विकारल्यावर हिंसेचा पूर्णपणे त्याग केला. त्यांनी मानव कल्याणासाठी अनेक कामे केली. खरेतर 'जनकल्याणच' त्यांच्या राज्याचा एक मार्गदर्शक सिद्धांत बनला होता. महात्मा गांधीजींनी अहिंसेच्या विचारांचे पालन करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. मानवी इतिहासात ह्या विचारांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. या विचारांवर आधारित विवेकपूर्ण निर्णयांद्वारे, आपण विविध समस्यांचे निराकरण करु शकतो. खरं तर जगभर आक्रमकता सारखी वाढताना दिसते आहे. आतंकवाद थैमान घालताना दिसतो आहे. यासाठी अहिंसेचा मार्ग आजही वैश्विक शांतता निर्माण करू शकेल. त्यावर सर्व संबंधितांनी विचार करण्याची गरज आहे.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर घटना मसुदा समिती बनवली गेली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष नियुक्त केले गेले. ते प्रकांड विद्वान आणि मानवतावादी तर होतेच पण त्याचबरोबर ते कायदा आणि घटनातज्ज्ञ ही असल्यामुळे भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकारही होते. घटनानिर्मितीमधील त्यांच्या महत्त्वपूर्ण योगदानाला नेहमीच लक्षात ठेवले जाईल. संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या संकल्पना जगातील विशाल लोकशाही असणाऱ्या भारताला सतत मार्गदर्शन करीत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पीडीत आणि आर्थिकदृष्टया कमजोर लोकांच्या उत्थानासाठी जीवनभर कार्यरत राहिले. त्यांची संकल्पना समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वावर आधारित एक आदर्श समाज स्थापित करण्याची होती आणि समाजात परिवर्तन घडविण्यासाठी ते शिक्षणाला एक महत्वाचे साधन मानत होते. कमजोर वर्गांना शिक्षीत करण्यासाठी त्यांनी अनेक संस्थांची स्थापना केली. त्यांचे विचार आणि कार्य पुढे नेणे हे आपले कर्तव्य आहे. मला आशा आहे की आपल्यासारख्या संस्था यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.

सर्वसमावेशक विकास आणि राष्ट्राची प्रगती आपले पहिले काम आहे. बौद्ध धर्मामध्ये समाजातील भेदभाव समाप्त करण्यावर भर दिला आहे. समाजामध्ये

समानता स्थापन करण्यासाठी उपेक्षित, वंचित आणि पीडीत लोकांच्या जीवनस्तरामध्ये सुधारणा घडवून आणणे गरजेचे आहे. यासाठी सरकारकडून अनेक महत्त्वाच्या योजना राबविल्या जातात. या विविध योजनांचा लाभ गरीबांपर्यंत पोहचण्यासाठी सरकार प्रतिबद्ध आहे. परंतु सरकारच्या योजनांना सफल बनविण्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

शेवटी मी म्हणेन की जर आपण भगवान बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीचे अनुकरण केले आणि परस्पर सामंजस्याची भावना स्विकारली तर एक समतेवर आधारीत समाज घडवू शकू.

आजचे हे महाधम्म अधिवेशन आयोजित केल्याबद्दल भिक्खु संघाज् युनायटेड बुद्धिस्ट मिशनला व त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांना मी शुभेच्छा देते आणि त्यांच्या या प्रयत्नासाठी सुयश चिंतिते.

धन्यवाद.

जय हिंद.